# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२२

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### तलवारबाजी संघटनेच्या बोगस प्राविण्य प्रमाणपत्राच्या आधारे शासनाची फसवणूक केल्याबाबत

**(१) १३७०५ (०३-०७-२०२२) श्री.गोपिचंद पडळकर : तारांकित प्रश्न क्रमांक ११८३० ला दिनांक ७ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध जिल्ह्यातील कार्यरत ७ पोलीस उपनिरीक्षक आणि ७ कर निरीक्षक अशा १४ प्रमुख पदावरील अधिकारी बनावट असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ च्या पहिल्या पंधरवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तलवारबाजी संघटनेच्या बोगस प्राविण्य प्रमाणपत्राचा आधार घेत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची दिशाभूल करून या अधिकाऱ्यांनी शासकीय नोकऱ्या बळकावल्या असून बनावट प्राविण्य प्रमाणपत्राला महासचिव अशोक दुधारे यांनी स्वतःच्या स्वाक्षरीने प्रमाणपत्र सादर करीत यासर्वांची प्रमाणपत्रे सत्य असल्याचा दाखला दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासाठी त्यांनी चुकीचा मुद्रांक वापरून शासनाची फसवणूक केलेली आहे याचा अहवाल क्रीडा आयुक्त ओमप्रकाश बकोरिया यांनी दिनांक ३० सप्टेंबर, २०२१ रोजी पोलीस महासंचालक संजय पांडेय यांना पाठवलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित जबाबदार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२२-०८-२०२२) :** (१), (२) व (३) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक १४/०६/२०२१ व दिनांक ३०/०९/२०२१ रोजीच्या पत्रान्वये शासनास व पोलीस महासंचालकांस सादर केलेल्या अहवालानुसार एकूण १४ उमेदवारांची क्रीडा वैधता प्रमाणपत्र रद्द करण्यात आली असल्याने ते सदर क्रीडा वैधता प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय सेवेत खेळाडू आरक्षण अंतर्गत अर्हता पात्र ठरत नाहीत.

तलवारबाजी संघटनेचे महासचिव यांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रामध्ये संबंधित खेळाडूंना दिलेल्या प्रमाणपत्रातील माहिती ही संघटनेच्या अभिलेख्यावरुन देण्यात आल्याचे स्पष्ट केले आहे.

(४) बनावट प्रमाणपत्राच्या आधारे शासन सेवेत रुजू उमेदवारांच्या व त्यांना प्रमाणपत्र वितरीत करणाऱ्या संबंधितांविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे निर्देश आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य यांनी दिले आहेत. बनावट प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय सेवेत विविध आस्थापनांवर कार्यरत असलेल्या उमेदवारांविरुध्द त्या-त्या संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांनी सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १२/१०/१९९३ च्या शासन निर्णयानुसार कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य यांनी त्यांच्या अहवालामध्ये १४ उमेदवारांपैकी ०७ उमेदवार हे पोलीस उपनिरीक्षक असल्याचे नमूद केले आहे. तथापि, सदर ७ उमेदवारांपैकी ५ उमेदावारांची नावे पोलीस उपनिरीक्षकाच्या सेवाजेष्ठता यादी व प्रशिक्षणास पाठविण्यात आलेल्या उमेदवारांच्या यादीमध्ये आढळून आली असून त्यापैकी ३ अस्थायी उमेदवारांना नोटीस बजाविण्यात आली आहे व २ स्थायी उमेदवारांविरुध्द प्राथमिक चौकशी व विभागीय चौकशी करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

तसेच आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्या अहवालामध्ये ७ कर निरीक्षक असल्याचे नमूद करण्यात आले असले तरी, फक्त ४ उमेदवारांची राज्य कर निरीक्षक पदावर शिफारस करण्यात आली असून सदर उमेदवारांना वस्तु व सेवाकर विभागाकडून नियुक्ती देण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## आळंदी-पंढरपूर पालखी महामार्गासाठी शेतकऱ्यांना भुसंपादनाकरीता मिळालेल्या नुकसान भरपाईच्या रकमेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२) १३७५० (३०-०६-२०२२) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेश कराड, श्री.नागोराव गाणार : तारांकित प्रश्न क्रमांक ११७५४ ला दिनांक १४ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आळंदी-पंढरपूर पालखी महामार्गाकरीता संपादन केलेल्या जमिनीचे नुकसान भरपाईचे वाटप भूसंपादन अधिकारी क्रमांक १६ यांच्यामार्फत संबंधित बाधित शेतकऱ्यांना करण्याचे काम सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या संपादन जमिनीमध्ये हरकती आहेत त्यांची सुनावणी भूसंपादन अधिकारी, सातारा यांचेमार्फत सुरु असून सदरहू भूसंपादन अधिकारी क्रमांक १६ सातारा हे सुनावणी झाल्यानंतर त्यामध्ये आदेश न काढता तडजोड करण्यासाठी संबंधितांवर दबाव टाकत असल्याचा प्रकार बरड येथील प्रकरणामध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची नुकसानभरपाई रक्कम साडेचार कोटी असून त्यामध्ये हरकत अर्जदारांना चार टक्के व सदरहू भूसंपादन अधिकारी यांना चार टक्के रक्कम देणेबाबत संबंधित जमीन बाधित शेतकरी यांच्यावर खाजगी एजंटच्या मार्फत दबाव टाकून गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणात दलालांना मध्यस्थी घेवून शेतकऱ्यांना मिळणाऱ्या मोबदल्यात नऊ टक्के रक्कम मागितली असल्याचे तसेच शेतकऱ्यांना सोडून इतरांना लाभ दिल्याचे या सारख्या अनेक घटना निदर्शनास आल्यामुळे सदरहू भ्रष्ट भूसंपादन अधिकाऱ्यांच्या गैरकारभाराची चौकशी करुन कारवाई करण्याची मागणी शेतकरी, सामाजिक कार्यकर्ते व अनेक संघटनेने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या दोषी भूसंपादन अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (२६-०८-२०२२) :** (१) होय.
(२) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(३) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(४) उप जिल्हाधिकारी भूसंपादन क्र.१६ सातारा यांचे विरूध्द १) श्री.रणजीत नवनाथ कसबे युथ जिल्हाध्यक्ष, लोक जनशक्ती पार्टी २) श्री.कैलास कुंभार जिल्हा संघटक संभाजी बिग्रेड ३) श्री.सचिन बर्गे महाराष्ट्र न्युज रिपोर्टर सातारा यांनी तक्रार अर्ज दिलेले असून सर्वच अर्जांमध्ये मोघम स्वरूपाचे मुद्दे मांडलेले आहेत. सदर अर्जामध्ये कोणत्याही खातेदाराचे नाव नमूद न करता तसेच काहीही लेखी वा इतर पुरावे न देता मोघम अर्ज दिलेले आहेत. सदर अर्जदारांचे क्षेत्र आळंदी पंढरपूर पालखी महामार्गामध्ये बाधित झालेले नाही. तसेच फलटण, खंडाळा या तालुक्यातील आळंदी ते पंढरपूर पालखी महामार्गाशी संबंधित गावांमधील कोणाही खातेदाराकडून अर्ज अथवा निवेदने प्राप्त झालेली नाहीत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील समुद्रात केरळच्या धर्तीवर सोलार इलेक्ट्रीक बोट सुरु करण्याबाबत

**(३) १३७९१ (३०-०६-२०२२) श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील समुद्रात केरळच्या धर्तीवर सोलार इलेक्ट्रीक बोट सुरु करण्याचा विचार मुंबई पोर्ट ट्रस्टसह महाराष्ट्र सागरी मंडळाकडून सुरु असल्याची बाब माहे एप्रिल, २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भाऊचा धक्का येथील फेरी बोटीला पर्याय म्हणून कोचीच्या धर्तीवर ही सेवा सुरु करण्याची चाचपणी करण्यात येत आहे तसेच सोलार बोटी अत्यंत महागड्या असून त्यांचा वेग कमी असल्याचेही बोट चालकांच्या निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, डिझेलच्या वाढत्या दरांमुळे मुंबईत सुरु असलेल्या वॉटर टॅक्सी सेवेचा खर्च वाढल्याने बेलापूर ते भाऊचा धक्का मार्गावरील सुरु झालेली वॉटर टॅक्सी सेवा बंद पडण्याची वेळ प्रशासनासह वाहतूकदारावर आली आहे हे ही खरे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्य शासनाने करमाफी देत वॉटर टॅक्सीला कार्यरत ठेवण्याबाबत तसेच सौर उर्जेवरील (सोलार) बोटीचा प्रयोग यशस्वी करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१७-०८-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) त्याचप्रमाणे बेलापूर ते DCT (भाऊचा धक्का) व गेटवे ऑफ इंडिया अशी वॉटर टॅक्सी सुरु करण्यास बोट चालकांस परवानगी देण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र राज्यातील जलवाहतूकीस चालना देण्यासाठी दिनांक १ जानेवारी २०२२ पासून नव्याने सुरु झालेल्या जलमार्गावर जलयान धारकांना प्रवासी कर व ट्रान्सशीपमेंट करात तीन वर्षासाठी सुट देण्याबाबत अधिसूचना क्रमांक संकीर्ण-०३२२/प्र.क्र. ४३/बंदरे-१ दिनांक २४ जून, २०२२ रोजी निर्गमित करणेत आली आहे.

---

## डाकुपिंप्री (ता.पाथरी, जि.परभणी) येथील अवैध वाळू उत्खनन होत असल्याबाबत

**(४) १३८३४ (३०-०६-२०२२) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डाकुपिंप्री (ता.पाथरी जि.परभणी) येथील रेती लिलाव धारकाने परवानगीच्या चौपट वाळू अवैधरित्या उपसा करून विक्री करून जिल्हाधिकारी परभणी यांनी नमूद केलेल्या अटी व शर्तीचे उल्लंघन केल्याप्रकरणी लोकप्रतिनिधी, परभणी यांनी दिनांक २० मे,२०२२ रोजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे ई-मेलव्दारे लेखी तक्रार नोंदविली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अधिकारी व कंत्राटदार यांनी केलेल्या वाळू गैरप्रकाराची राज्यस्तरीय पथकाकडून ड्रोन कॅमेरा व ईटीएस मशीनव्दारे पाहणी व चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने तसेच अवैध वाळू उत्खनन प्रकरणी दोषी अधिकारी व कंत्राटदार यांच्यावर कारवाई करण्याबाबत तसेच त्यांच्याकडून दंडात्मक आर्थिक नुकसानाची वसूली करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१७-०८-२०२२) :** (१), (२), (३) व (४) मौजे डाकुपिंप्री ता.पाथरी वाळुघाटाची ड्रोनद्वारे मोजणी करण्यात आली असता लिलावधारकाने २७८३.५६ ब्रास उत्खनन केल्याचे व महाखनिज प्रणालीद्वारे मोजणी दिनांकापर्यंत २३२९ ब्रास वाहतूक केल्याचे निदर्शनास आले. रेतीघाटवरील रेती उत्खननाची मोजणी, ऑनलाईन उचल व रेती डेपोवरील प्रत्यक्ष साठा याच्या ताळमेळा आधारे लिलावधारक यांनी ४५४ ब्रास ईटीपी शिवाय रेती वाहतूक केल्याचे निर्दशनास आल्याने संबंधित लिलावधारक यांना उपविभागीय अधिकारी, पाथरी यांनी दिनांक २८/०६/२०२२ रोजीच्या आदेशान्वये रुपये ८०,९०,२८०/- इतक्या रकमेच्या दंडाची नोटीस देण्यात आलेली आहे.

---

## घोडबंदर (जि.ठाणे) रोडवरील मोघरपाडा येथील मेट्रो-४ च्या कारशेडमुळे बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याबाबत

**(५) १३८४१ (०७-०७-२०२२) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घोडबंदर (जि.ठाणे) रोडवरील मोघरपाडा येथील मेट्रो-४ च्या प्रस्तावित कारशेडमुळे बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळाली नसल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मेट्रो-४ च्या कारशेडमध्ये बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१६-०८-२०२२) :** (१), (२) व (३) मौजे मोघरपाडा येथील स.नं. ३० येथे २११.७६.० हे. आर एवढी जमीन असून त्यापैकी १०४.७२.० हे. आर क्षेत्र शेतकऱ्यांना वाटप करण्यात आली आहे. उर्वरीत जमीन शासनाची आहे. या सर्व्हे नंबर मधील वहिवाटधारक व शासकीय जमिनीची मोजणी होऊन गट निश्चिती होणे आवश्यक आहे. दिनांक २०/०१/२०२२ रोजी प्रत्यक्ष जागेवर जाऊन सं. नं. ३० मधील जमीनधरकांनी वहिवाटीप्रमाणे मोजणी प्रक्रिया पार पडली आहे. तथापि, सदर प्रकरणी सविस्तर मोजणी प्रक्रिया पार पडल्यानंतर अंतिम निर्णयांती शासन नियमानुसार बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याचे नियोजित आहे.

---

## ठाणे महानगरपालिकेने रस्त्यांच्या कामासाठी काळ्या यादीत टाकलेल्या कंपन्यांचा निविदा प्रक्रियेत समावेश केल्याबाबत

**(६) १३८४२ (०१-०७-२०२२) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने ठाणे महानगरपालिकेला रस्त्यांच्या कामांसाठी रुपये २५० कोटी अनुदान दिले असून सदर रस्त्यांच्या कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निविदा प्रक्रियेमध्ये ठाणे महानगरपालिकेने काळ्या यादीत टाकलेल्या कंपन्यांचा समावेश केला असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काळ्या यादीतील कंपन्यांना निविदा प्रक्रियेत सामावून घेण्याबाबत महानगरपालिकेने काही ठराव मंजूर केला आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने काळ्या यादीतील कंपन्यांना दिलेला कंत्राट रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१८-०८-२०२२) :** (१), (२), (३) व (४) ठाणे महानगरपालिकेस दिनांक १७/०२/२०२२ च्या शासन आदेशान्वये रस्त्यांच्या विविध कामासाठी "मूलभूत सोई सुविधांचा विकास योजनेंतर्गत" २१४.०० कोटीचे अनुदान मंजूर केले आहे.

सदर रस्त्यांच्या विविध कामांची निविदा प्रक्रिया ठाणे महानगरपालिकेमार्फत दिनांक ०७/०३/२०२२ ते दिनांक २१/०३/२०२२ या कालावधीत राबविण्यात आली होती. सदर निविदा प्रक्रियाअंती आयुक्त तथा प्रशासक, ठाणे महानगरपालिका यांनी दिनांक ०६/०६/२०२२ रोजी सदरच्या प्रस्तावाअंतर्गत निविदा स्वीकृती व सक्षम आर्थिक मान्यता प्रदान केली आहे.

उपरोक्त अनुदानाअंतर्गत ठाणे महानगरपालिकेच्या क्षेत्रातील विविध रस्त्यांचे क्राँक्रीटीकरण, मजबुतीकरण, अनुषांगिक नाले व सी.डी.वर्क बांधकाम, डांबरीकरण इ. कामांचा समावेश करण्यात आला आहे.

उपरोक्त कामांकरीता प्राप्त निविदांकारापैकी कोणत्याही निविदाकारास काळया यादीत टाकण्याची कार्यवाही केलेली नसल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

सदर कामांकरीता ठाणे महानगरपालिकेने दिनांक १४/०६/२०२२ रोजी कार्यादेश दिले असून सद्य:स्थितीत कामे सुरू असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विजयदुर्ग बंदर विकसित करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(७) १३९३६ (३०-०६-२०२२) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेश कराड, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विजयदुर्ग बंदराला आंतरराष्ट्रीय दर्जाचे बंदर होण्यासाठी केंद्र शासनाने मंजुरी दिल्याची बाब माहे मे, २०२२ रोजीच्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत अद्यापपर्यंत कोणत्याच प्रकारची कार्यवाही करण्यात आली नसून सदर बंदरावरील उद्योग बंद पडल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विजयदुर्ग बंदरात समुद्र किनाऱ्यापासून चार मीटरची खोली आहे, तर दीड कि.मी. परिघात १८ मीटरची खोली आहे त्यामुळे जेएनपीटी आणि मुंबई पोर्ट यांच्याप्रमाणे विजयदुर्ग बंदराची भौगोलिक परिस्थिती उद्योगासाठी सक्षम आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सिंधुदुर्ग जिल्ह्यासारख्या पर्यटन क्षेत्रात उद्योग वाढीसाठी त्याचप्रमाणे रोजगार निर्मिती करण्यासाठी विजयदुर्ग बंदराच्या विकासासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१७-०८-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) विजयदुर्ग बंदराच्या विकासासाठी खाजगी विकासक कंपनीशी दिनांक २८/०३/२००८ रोजी ५० वर्षांचा सवलत करारनामा स्वाक्षांकित करण्यात आला होता.परंतु, विकासकाने

बंदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी कोणतीही भरीव प्रगती न केल्यामुळे सदरचा सवलत करारनामा दिनांक ७/११/२०१९ रोजीच्या पत्रान्वये संपुष्टात आणण्यात आला.

महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या संचालक मंडळाच्या दिनांक ०७/०४/२०२२ रोजी संपन्न झालेल्या ७६ व्या बैठकीत, बंदर विकासकाची नव्याने निवड करण्यास व त्यासाठी निविदा मागविण्यास मंजूरी देण्यात आली आहे.

---

## मुंबईतील नागरिकांना पुरेसा पाणीपुरवठा करण्याबाबत

**(८) १३९४५ (०१-०७-२०२२) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर आणि उपनगरातील झोपड्या, चाळी आणि इमारतींमध्ये मुंबई महानगरपालिकेमार्फत कमी दाबाने पाणी येत असल्याने मोटार लावून पाणी ओढले जात असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणी पुरवठ्याच्या राष्ट्रीय मानकानुसार शहरात राहत असलेल्या प्रत्येक व्यक्तीला १५० लिटर पाण्याची गरज असून मुंबईतील झोपडपट्यांमध्ये दर मानसी दररोज ४० लिटरपेक्षाही कमी पाणी पिण्यासह घरगुती वापरासाठी मिळत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईतील नागरिकांना पुरेशा दाबाने त्याचप्रमाणे प्रत्येक व्यक्तीला पुरेल इतके पाणीपुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१८-०८-२०२२) :** (१) काही ठिकाणी पाण्याचा दाब कमी असल्यास मोटार लावून पाणी ओढले जाते, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) राष्ट्रीय मानकानुसार मेगा सीटी व महानगरातील इमारतींमधील रहिवाश्यांना जलवाहिन्यांद्वारे पाणीपुरवठा होत असल्यास व मलनि:सारण व्यवस्था अस्तित्वात असल्यास पाणी पुरवठ्याचे प्रमाण दर माणसी दररोज १५० लीटर इतके आहे.

तसेच, राष्ट्रीय मानकानुसार महानगरातील झोपडपट्टीत उभ्या खांब जलजोडणीद्वारे पाणीपुरवठा ४० लीटर प्रतिव्यक्ती प्रतिदिन या दराने करावयाचा आहे. तथापि, मुंबईतील झोपडपट्टीत ४५ लीटर प्रतिव्यक्ती प्रतिदिन या दराने पाणीपुरवठा करण्यात येतो, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) मुंबईतील नागरिकांना पुरेशा दाबाने त्याचप्रमाणे प्रत्येक व्यक्तीला पुरेल इतके पाणीपुरवठा करण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना व कार्यवाही करण्यात येते :-

- अस्तित्वात असलेल्या जलवाहिन्यांचे आकार विस्तार/ सक्षमीकरण करणे.
- जुन्या व जीर्ण जलवाहिन्या बदलणे, नवीन जलवाहिन्या टाकणे - मागील तीन वर्षात सुमारे ५०.७६ कि.मी. लांबीच्या जलवाहिन्या बदलून नवीन जलवाहिन्या टाकण्यात आल्या आहेत.

- सेवा जलजोडण्यांचे नुतनीकरण करणे - मागील तीन वर्षात सुमारे ५१,५२३ जलजोडण्यांचे नुतनीकरण केले आहे.
- सेवा जलजोडण्यांच्या जुडग्यांऐवजी एक सामाईक जलवाहिनी टाकणे - मागील तीन वर्षात सुमारे ३०५ ठिकाणी जलजोडण्यांचे जुडगे काढून सामाईक जलवाहिनी तसेच स्टब मेन्स टाकण्यात आल्या आहेत.
- गळतीची ठिकाणे शोधून गळती तात्काळ बंद करणे – मागील तीन वर्षांत सुमारे १,०१,१५६ गळत्या दुरुस्ती करण्यात आल्या.
- उंचावरील झोपडपट्टयांना पाणीपुरवठा करण्यासाठी भूमिगत शोषण टाकी व उदंचन व्यवस्था निर्माण करणे इ. कामे करण्यात येतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेतील रिक्त पदे भरण्याबाबत

**(९) १३९४७ (२५-०६-२०२२) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेश कराड, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेत १ लाख २० हजार पदे मंजूर असून नियमित भरती आणि कंत्राटी पध्दतीने आस्थापना अनुसुचीवर प्रत्यक्ष कार्यरत पदे ९७ हजार असल्यामुळे सुमारे २३ हजार पदे रिक्त असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेत करण्यात आलेल्या आधुनिकीकरण, नवीन तंत्रज्ञान व कंत्राटी पध्दतीने उपलब्ध मनुष्यबळाद्वारे नियमित कामे करण्यात येत असल्याने पालिकेतील एकूण पदे आणि प्रत्यक्ष मुनष्यबळाची पडताळणी केल्यास रिक्त पदे अधिक असून, मुंबई महानगरपालिकेत अनेक वर्ष विविध विभागांची रिक्त पदे भरली जात नसल्याने त्यांचा परिणाम मुंबईकरांना मिळणाऱ्या सेवांवर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागातील मुकादम ते आगार परिचर पर्यंतच्या विविध पदांवर गेल्या अनेक वर्षांपासून कामगारांची भरती करण्यात आली नसल्याचे दिनांक २४ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागातील मुकादम व प्रतिवेदन वाहक पदे सफाई कामगारांमधून तसेच उपद्रव शोधक, चाळ राखणदार, आगार परिचर ही पदे प्रतीवेदन वाहक, मुकादम पदावरील कर्मचाऱ्यांतून पदोन्नतीने भरती करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेतील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१६-०८-२०२२) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध आस्थापनेवर माहे मार्च, २०२२ अखेरपर्यंत वर्ग १ ते ४ मध्ये एकूण १,४०,५४४ इतकी मंजूर पदे असून, त्यापैकी ९४,२७२ इतकी पदे भरली आहेत व ४६,२७२ इतकी पदे रिक्त आहेत असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दिनांक ३०/०९/२०१९ रोजीच्या आदेशानुसार, बृहन्मुंबई महानगरपालिकेत महसुली व खर्चातील काटकसरीचे धोरण अवलंबण्यात आल्यामुळे नवीन सर्वसाधारण पदभरती करण्यात आलेली नाही. यांत्रिकीकरणामुळे काही पदे कालबाह्य झालेली आहेत. तसेच, कार्यरत कर्मचारी सातत्याने पदोन्नत/सेवानिवृत्त होत असतात. या कारणांमुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेतील पदे रिक्त राहतात.

तसेच, अत्यावश्यक सेवेमध्ये त्या-त्या विभागाद्वारे आवश्यकतेनुसार बाह्यस्त्रोत्रांद्वारे कंत्राटी तत्वावर मनुष्यबळ उपलब्ध करण्यात येऊन कामकाज करण्यात येते, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घन कचरा व्यवस्थापन विभागातील भरती वर्ष २०२०-२१ मधील शहरे व पूर्व उपनगरातील मुकादम संवर्गाची अनुक्रमे १५६ व ८५ रिक्त पदे पदोन्नतीने भरण्यात आली आहेत व पश्चिम उपनगरातील मुकादम संवर्गाची १८१ रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घन कचरा व्यवस्थापन विभागातील उपद्रव शोधक पदे भरण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील उपद्रव शोधक, आगार परिचर व चाळ राखणदार ही रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सद्य:स्थितीत विनाविलंब कार्यान्वित आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील विविध संवर्गातील रिक्त असलेली पदे सातत्याने भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील प्रलंबित विकास कामे सुरु करण्याबाबत

**(१०) १३९५१ (०७-०७-२०२२) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेत प्रशासनाची नियुक्ती झाल्यानंतर निविदा मागविण्याचे प्रमाण ८० ते ९० टक्क्यांनी घटल्यामुळे विकासकामे बंद झाल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशासकाद्वारे मुंबईतील मंजूर कामांची निविदा न मागविण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईतील मंजूर विकासकामे सुरु करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१६-०८-२०२२) :** (१), (२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुक न झाल्यामुळे प्रभाग समिती निधी व प्रभागनिहाय नगरसेवक निधी विकासकामांकरीता प्राप्त झालेला नाही.

त्याव्यतिरिक्त सन २०२२-२३ च्या आर्थिक तरतुदीनुसार विकासकामांच्या निविदा प्रक्रिया नियमितप्रमाणे राबविण्यात येत आहेत, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवीन पनवेल (जि.रायगड) येथील भूखंड सिडकोने माझगाव डॉक लिमिटेड कंपनीला स्वस्त दरात दिल्यामुळे शासनाचे नुकसान झाल्याबाबत

**(११) १३९९२ (१२-०७-२०२२) श्री.सुरेश धस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवीन पनवेल (जि.रायगड) सेक्टर २१ मधील ५४००० चौरस मीटरचा भूखंड सिडकोने माझगाव डॉक लिमिटेड कंपनीला स्वस्त दरात दिला असून सदर भूखंड माझगाव डॉकने अनधिकृतपणे १५ सहकारी गृहनिर्माण संस्थांना हस्तांतरण केल्यामुळे सिडकोचे व शासनाचे रुपये १०० कोटींचे नुकसान झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कंपनीच्या धोरणानुसार सदर जमीन ताब्यात घेऊन प्रचलित भावाच्या २५० टक्के दराने देणे गरजेचे असतानाही सवलतीच्या दराने दिली असून सिडकोच्या संबंधित अधिकाऱ्यांनी विकासकाशी संगनमत करुन या जमिनीची परस्पर विल्हेवाट लावून १५ सहकारी संस्थांना हस्तांतरित केलेली जमीन नियमित करण्याचा प्रस्ताव बीओडीने फेटाळला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, व्यवस्थापक (शहरी सेवा) यांना भूखंडाचा ताबा घेण्याचे सांगूनही त्यांनी कोणतीही कारवाई न केल्याने या सोसायट्यांना फसवून सदरहू जमीन एका विकासकाने बळकावलेली असल्याने महामंडळाचे व शासनाचे कोट्यवधींचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर जमीन महामंडळाच्या किंवा शासनाच्या ताब्यात देऊन संबंधित अधिकारी व विकासक यांच्यावर गुन्हे दाखल करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१७-०८-२०२२) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

मौजे काळुंद्रे, नवीन पनवेल मधील सेक्टर-२१, भुखंड क्र.३, क्षेत्र ५३७९९.९९ चौ.मी. हा भूखंड माझगाव डॉक लि. यांना दिनांक ०८/०१/१९८२ रोजी वाटप करण्यात आला असून सदर भुखंडाचा करारनामा दिनांक १८/०३/१९९७ रोजी करण्यात आला आहे. सदर भूखंड माझगाव डॉक लि. यांना रहिवाशी वापराकरीता देण्यात आला होता. तथापि, सदरचा भूखंड हस्तांतरण शुल्क स्वीकारून व त्रीपक्षीय करारनामा करून माझगाव डॉक लि. कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी स्थापन केलेल्या १५ सहकारी गृहनिर्माण संस्थाना हस्तांतरित करण्यात आला आहे. माझगाव डॉकच्या कर्मचाऱ्यांच्या १५ सहकारी गृहनिर्माण संस्थांना वाटप केलेल्या भूखंड हस्तांतरण नियमित करण्याचा प्रस्ताव सिडकोने दिनांक २३/०२/२०१२

रोजी शासनास सादर केला होता.त्यावर सिडको संचालक मंडळाने नवी मुंबई जमीन विनियोग (सुधारणा) विनियम, २००८ च्या विनियम ४(i) ४ (ii) अन्वये सवलतीच्या दराने वाटप केलेल्या जमीनीच्या पुढील हस्तांतरणासंदर्भात सुस्पष्ट धोरण ठरवून त्यानुसार पुढील उचित कार्यवाही करणेबाबत शासनाच्या दिनांक १७/०८/२०१३ च्या पत्रान्वये सिडकोस कळविण्यात आले आहे.

दरम्यानच्या काळात महालेखापरिक्षक (वाणिज्यीक लेखा परिक्षा) यांनी सदर भूखंड हस्तांतरित केल्यामुळे उध्दवलेल्या महसूल तोटया संदर्भात लेखा आक्षेप उपस्थित केला होता. सन २०१०-११ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) १६ व्या अहवालातील सिडकोच्या कामकाजासंबंधीतील सार्वजनिक उपक्रम समितीपुढे सादर होऊन त्यावरील अहवालामध्ये समितीने सदर संस्थांना सन २०१३-१४ च्या मूळ दराच्या २५०% आकारुन त्यामधून पूर्वीची रक्कम वजा करुन भूखंड हस्तांतरण करणेची शिफारस केली होती. त्यानुसार शासनाने दिनांक १५/०५/२०१८ रोजी सिडकोस कळविले आहे.

शासनाच्या पत्रास अनुसरुन १५ गृहनिर्माण संस्थांना इरादापत्र देण्यात आले असून त्यापैकी १३ संस्थांनी इरादापत्रानुसार भाडेपट्टा अधिमुल्य भरणा केला असून ११ संस्थांसोबत सुधारित करारनामा करण्यात आला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ऑक्सिजन प्लांटचे काम वेळेत पूर्ण न करणाऱ्या अधिकारी व कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत

**(१२) १४०६४ (०१-०७-२०२२) श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अधिकारी व कंत्राटदार यांचेकडून रुपये २६७ कोटींच्या १९ पैकी १७ ऑक्सिजन प्लांटचे काम वेळेत पूर्ण झाले नसून याप्रकरणी कंत्राटदाराकडून रुपये ४.०७ कोटींचा क्षुल्लक दंड आकारण्यात आल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर १९ पैकी १२ कामे मेसर्स हायवे कन्स्ट्रक्शन कंपनीस तर ७ कामे ही मेसर्स जीएसएन असोसिएटसला देण्यात आली असून पहिल्या टप्प्यात सदरहू कामे विहित मुदतीत पूर्ण न केलेल्या मेसर्स हायवे कन्स्ट्रक्शन कंपनीस काळ्या यादीत टाकण्याऐवजी पालिकेने दुसऱ्या टप्प्यातील रुपये ५९.३६ कोटींच्या नवीन कामांचे कार्यादेश दिनांक २७ सप्टेंबर, २०२१ रोजी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामांत दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करुन दंड फक्त कंत्राटदारकडून आकारला गेला, सदर प्रकरणाची जबाबदारी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांवर निश्चित करुन त्यांच्यावरही कारवाई करण्यात यावी, अशी मागणी माहिती अधिकारी कार्यकर्ते यांनी मा.मुख्यमंत्री व आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ऑक्सिजन प्लांट उभारण्याच्या कामामध्ये विलंब केल्यामुळे कंत्राटदार व महानगरपालिकेच्या संबंधित दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१८-०८-२०२२) :** (१) मे. जी.एस.एन. असोसिएट्स आणि हायवे कन्स्ट्रक्शन कंपनी या कंत्राटदारांकडून १९ पैकी १७ ऑक्सिजन प्लांटच्या कामात झालेल्या विलंबाबाबत दोघांना मिळून एकूण रुपये ४.०७ कोटी इतक्या रकमेचा दंड आकारण्यात आला आहे, हे खरे आहे.

तथापि, सदर दंड निविदेच्या/कंत्राटाच्या अटी व शर्तीनुसार योग्य प्रकारे आकारण्यात आला आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) कोविड-१९ च्या दुसऱ्या लाटेदरम्यान प्राणवायूच्या कमतरतेचा अभाव पाहता, तिसऱ्या लाटेच्या तयारीसाठी प्राणवायूबाबत सुसज्ज व स्वयंनिर्भर राहणे गरजेचे होते. मात्र त्या तयारीकरीता पुरेसा अवधी नसल्याने पहिल्या निविदेच्या कामादरम्यान दुसऱ्या निविदेची प्रक्रिया पूर्ण करुन सयंत्र उभारणी करणे क्रमप्राप्त होते.

त्यानुषंगाने महानगरपालिकेमार्फत मागविण्यात आलेल्या ई-निविदेचे दुसरे काम मे. हायवे कन्स्ट्रक्शन कंपनी यांना मिळाले होते.

मे. हायवे कन्स्ट्रक्शन कंपनी यांनी पहिल्या टप्प्यातील काम यशस्वीरित्या पूर्ण केले आहे. मात्र निविदेतील अटींनुसार कार्यपूर्तीच्या विलंबाबाबत निविदेच्या अटी व शर्तीनुसार दंड आकारण्यात आलेला असल्यामुळे त्यांना काळ्या यादीत समाविष्ट करणे उचित नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) हे खरे आहे.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून संपूर्ण निविदा प्रक्रिया तसेच, कार्यान्वितीकरणाचे काम संपूर्णरित्या पारदर्शी पध्दतीने तसेच महानगरपालिकेच्या नियम व धोरणानुसार वेळोवेळी सर्व प्रशासकीय आवश्यक बाबी पूर्ण करुन पार पाडलेले आहे.

तसेच, उशिरा काम पूर्ण केल्याबद्दल मे. जी.एस.एन. असोसिएट्स आणि हायवे कन्स्ट्रक्शन कंपनी यांना निविदेच्या अटी व शर्तीनुसार दंड आकारण्यात आलेला आहे. यास्तव सदर प्रकरणी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सगरोळी व बोळेगाव (ता.बिलोली, जि.नांदेड) येथील अवैध रेती वाहतूकीबाबत

**(१३) १४११३ (३०-०६-२०२२) श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सगरोळी व बोळेगाव (ता.बिलोली, जि.नांदेड) येथे ओव्हरलोड रेतीच्या ट्रकची वाहतूक रस्त्यावर सुरु असल्याचे दिनांक ५ एप्रिल,२०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यावर शाळकरी मुलांची ये-जा असल्याने पालक मुलांच्या काळजीने भयभीत झाले असून जिवीतहानीची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सगरोळी व बोळेगाव (ता.बिलोली, जि.नांदेड) येथील ओव्हरलोड वाहतुकीवर निर्बंध आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१७-०८-२०२२) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) सगरोळी व बोळेगाव (ता.बिलोली, जि.नांदेड) रेतीघाटातुन ओव्हरलोड वाहतूक होवु नये म्हणुन प्रत्येक गावाच्या ठिकाणी मंडळ अधिकारी व तलाठी यांचे पथक स्थापन करण्यात आले आहे. तसेच जिल्हास्तरीय संनियंत्रण समितीच्या बैठकीत दिलेल्या निर्देशान्वये नांदेड जिल्ह्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीस विभाग, परिवहन विभाग व महसूल विभागाचे अधिकारी / कर्मचारी यांचे संयुक्त पथक कार्यरत ठेवले आहे.

---

## उमरी (जि.नांदेड) तालुक्यातील ईळेगाव, भायगाव येथे रेतीचा अवैध उपसा होत असल्याबाबत

**(१४) १४११९ (३०-०६-२०२२) श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर : दिनांक ४ मार्च, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १४ मधील प्रश्न क्रमांक ११३३७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरी (जिल्हा नांदेड) तालुक्यातील ईळेगाव, भायगाव येथे गोदावरी नदी पात्रातून तराफाद्वारे रेतीचा अवैध उपसा होत असल्याचे दिनांक ०१/०४/२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे शासनाचा मोठ्या प्रमाणात महसूल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेवून येथील अवैध वाळू उपसा रोखून येथील वाळू माफीयांना कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१७-०८-२०२२) :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

---

## मुंबईतील जे.जे. रुग्णालयात बालरोग चिकित्सा विभागात कार्यरत असलेल्या महिला डॉक्टरला मारहाण केल्याबाबत

**(१५) १४१८५ (०७-०७-२०२२) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जे.जे. रुग्णालयात बालरोग चिकित्सा विभागात कार्यरत असलेल्या एका महिला निवासी डॉक्टरला मृत रुग्णाच्या नातेवाईकांनी मारहाण केल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डॉक्टरांवरील हल्ल्यांचे प्रमाण वाढले असून मागील काही महिन्यांमध्ये औरंगाबाद, नागपूर व यवतमाळ येथे अशा घटना घडलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन डॉक्टरांना मारहाण करणाऱ्यांविरुध्द कारवाई करुन त्यांच्या सुरक्षिततेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०२२) :** (१) हे खरे आहे. उक्त प्रकरणी फिर्यादी डॉक्टरने दिलेल्या तक्रारीवरुन आरोपीविरुध्द गु.र.नं.२६५/२०२२, कलम ३५३,३३२,५०६ भादवं सह कलम ३, ४, ५ महाराष्ट्र वैद्यकीय सेवा- व्यक्ती आणि वैद्यकीय सेवा संस्था (हिंसक कृत्ये व मालमत्तेची हानी किंवा नुकसान यांना प्रतिबंध) अधिनियम-२०१० अन्वये गुन्हा नोंद आहे.
(२) हे खरे आहे.
(३) (I) डॉक्टरांना मारहाण करणाऱ्यांविरुध्द गुन्हे दाखल करुन कायदेशीर कारवाई करण्यात येते.
(II) सुरक्षेच्या दृष्टीने हॉस्पीटलच्या परिसरात पोलीस पेट्रोलिंग लावण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## डहाणू (जि.पालघर) येथील तत्कालीन तहसिलदाराने नियमाबाह्य बांधकामास परवानगी दिल्याबाबत

**(१६) १४६४४ (०३-०७-२०२२) श्री.विलास पोतनीस, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डहाणू (जि.पालघर) येथील तत्कालीन तहसिलदार यांनी सीआरझेड कायद्याचे उल्लंघन करीत चिंचणी समुद्रालगतच्या जमिनीच्या मालकाला नियमबाह्य बांधकाम करण्याची सवलत दिल्याचे प्रकरण दिनांक २३ मे, २०२२ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जमीन मालकांनी जमिनीवर अनधिकृत बंगलाही बांधला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांनी जमीन मालकावर व नियमाबाह्य जमिनीवर बांधकामास परवानगी देणाऱ्या तहसिलदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१७-०८-२०२२) :** (१), (२), (३) व (४) मौजे चिंचणी, ता.डहाणू, जि.पालघर येथील गट क्रमांक ५१३ व गट क्रमांक ५१४ ही जमीन महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ४२ ड नुसार अकृषिक करण्याबाबत तत्का. तहसिलदार, डहाणू यांनी दिनांक ०९/०६/२०२१ अन्वये परवानगी दिली होती. सदर आदेश जिल्हाधिकारी, पालघर यांच्या दिनांक ०४/०४/२०२२ रोजीच्या आदेशान्वये रद्द करण्यात आले असून सदर जमिनीवर झालेले अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदर प्रकरणी अनियमितता करणाऱ्या तत्कालीन तहसिलदार, डहाणू, जि.पालघर यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यास विभागीय आयुक्त, कोकण यांना कळविण्यात आले आहे.

---

## सातारा जिल्ह्यातील कोरेगांव, खटाव व सातारा तालुक्यातील नदीपात्रामधून बेकायदा वाळू उपसा होत असल्याबाबत

**(१७) १४६५३ (०३-०७-२०२२) श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील कोरेगांव, खटाव व सातारा तालुक्यातील सोनगांव, जिहे कटापूर, सातारा रोड (पाडळी) देऊर, जळगांव, पुसेगांव व ललगूण या गावातील नदीपात्रात बेकायदेशीर मशिनरीचा वापर करुन व तत्संबंधित नियमांचा भंग करुन वाळू उपसा करण्यात येत असल्याच्या तक्रारी ग्रामस्थांकडून होत आहेत तसेच दिनांक २५ मे, २०२२ रोजी त्याबाबतच्या बातम्या छायाचित्रासहित वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाल्या हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वर्तमानपत्रामध्ये बातम्या आल्यानंतर दुसऱ्या दिवशी महसूल विभागाने कारवाई करणे अपेक्षित होते, परंतु, तसे न होता पोलीस विभागाने ही कारवाई केली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गावातील नदीपात्रातील बेकायदेशीर वाळू उपसा रोखण्याबाबत महसूल विभागाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१६-०८-२०२२) :** (१) सातारा जिल्ह्यातील कोरेगांव, खटाव, सातारा तालुक्यातील सोनगांव, जिहे, कटापूर, सातारा रोड (पाडळी), देऊर, जळगांव, पुसेगांव व ललगुण या गावातील नदीपात्रात बेकायदेशीर मशिनरीचा वापर करुन व तत्संबंधित नियमांचा भंग करुन वाळू उपसा करण्यात येत असल्याच्या तक्रारी ग्रामस्थांकडून प्राप्त नाहीत. तथापि, दैनिक पुढारी या वृत्तपत्रात दिनांक २५/०५/२०२२ रोजी सातारा तालुक्यातील सोनगांव येथील वाळूगटातून नियमभंग करुन वाळू उपसा करण्यात येत असल्याची बातमी प्रसिध्द झाली होती.

(२) दिनांक २४/०५/२०२२ रोजी पोलीस विभागाला प्राप्त माहितीच्या आधारे मौजे सोनगांव सं.निंब येथे लिलावाद्वारे मंजूर वाळू भूखंडालगतच्या परिसरात यंत्रसामुग्री आढळून आल्याने सातारा शहर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.४४४/२०२२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तद्नंतर उक्त कारवाईच्या अनुषंगाने दिनांक २५/०५/२०२२ रोजी वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली आहे.

(३) तलाठी, सोनगांव निंब यांनी दिनांक १७/०५/२०२२ व दिनांक १९/०५/२०२२ रोजी मौजे सोनगांव निंब या वाळूगटालगत झालेल्या उत्खननाबाबत पंचनामा केला असून त्यानुसार संबंधित लिलावधारकास तहसिलदार, सातारा यांनी दिनांक २५/०५/२०२२ रोजी नोटीस बजावली आहे. सदर नोटीसीच्या अनुषंगाने लिलावधारक यांचा दिनांक २७/०५/२०२२ रोजी खुलासा प्राप्त झाला असून खुलाश्याच्या अनुषंगाने तहसिलदार, सातारा यांचे स्तरावर पुढील कार्यवाही सुरु आहे.

सातारा जिल्ह्यामध्ये दिनांक ०१/०४/२०२२ ते ३०/०६/२०२२ या कालावधीत गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या ३० प्रकरणी दंडात्मक कारवाई करुन रुपये २०,२३,०००/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे. तसेच एका प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून ९ वाहने जप्त करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे वाघेरी (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) येथील ४. ९८ हे.आर क्षेत्रामध्ये मे सिध्दिविनायक मायनिंग कंपनीला सिलिका सॅण्ड आणि क्वार्टझाईट या गौण खनिजासाठी देण्यात आलेला खानपट्टा रद्द करण्याबाबत

**(१८) १४६९३ (३०-०६-२०२२) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे वाघेरी (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) येथील मे सिध्दिविनायक मायनिंग यांना भूमापन क्रमांक ११४४/१/१ व ११४४/१/२ एकूण क्षेत्र ४.९८ हे.आर क्षेत्रामध्ये पाच वर्षे मुदतीकरीता सिलिका सण्ड आणि क्वार्टझाईट गौण खनिज खानपट्टा सिंधुदुर्ग जिल्हा प्रशासनाने मंजूर केलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर खाणपट्टा क्षेत्रामध्ये सिलिका सॅण्ड आणि क्वार्टझाईट या गौण खनिजाचा साठा नसतानाही, सदर कंपनीने जिल्हा खनिकर्म अधिकारी, सिंधुदुर्ग यांचेकडून सदर क्षेत्रामध्ये गौण खनिजाचा साठा असल्याचे खोटे गौण खनिज प्रमाणपत्र घेवून त्यानुसार खाणपट्टा मंजूर करून घेतला आहे इतकेच नव्हेतर तेथे गौण खनिज नसतानाही या कंपनीने बाहेरून अन्य ठिकाणाहून अनधिकृतरित्या अवैध उत्खनन करून मंजूर केलेल्या खानपट्ट्यात त्याची साठवणूक करून गैरव्यवहार झाला असल्याने शासनाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून वाघेरी (ता कणकवली, जि सिंधुदुर्ग) येथील भूमापन क्रमांक ११४४/१/१ व ११४४/१/२ येथील एकूण क्षेत्र ४. ९८ हे. आर मध्ये पाच वर्षासाठी मंजूर केलेला खाणपट्टा विनाविलंब रद्द करण्यात यावा, अशा आशयाचे मागणीचे एक सविस्तर निवेदन मा स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी संचालक भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर यांना दिनांक ६ मे, २०२२ रोजी सादर केले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू मागणीबाबत निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१७-०८-२०२२) :** (१) व (२) होय हे खरे आहे.
(३) व (४) सन्माननीय विधानसभा सदस्य यांनी निवेदनात उपस्थित केलेले मुद्दे तसेच वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, प्रादेशिक कार्यालय, कोल्हापूर, जिल्हा खनिकर्म अधिकारी, सिंधुदुर्ग व विधानसभा सदस्य यांचे प्रतिनिधी यांनी दिनांक २८/०५/२०२२ रोजीच्या स्थळ पाहणीवेळी आढळून आलेल्या बाबी विचारात घेऊन चौकशी पूर्ण होईपर्यंत सदर खाणपट्ट्यास दिनांक ०३/०६/२०२२ च्या आदेशान्वये तात्पुरती स्थगिती देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणाची संपूर्ण चौकशी करण्यासाठी जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी उप विभागीय अधिकारी (महसूल), कणकवली यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे.

---

## कोकण विभागातील गौण खनिज समस्येवर तोडगा काढण्याबाबत

**(१९) १४८३४ (३०-०६-२०२२) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय हरित लवाद न्यायाधीकरणाच्या पुणे खंडपीठाने दिनांक १७ फेब्रुवारी, २०२२ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने दिनांक २४ मार्च, २०२२ रोजीच्या पत्रान्वये तात्पुरते गौण खनिज परवाने पर्यावरण दाखल्याशिवाय न देण्याचे आदेश सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांना दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आदेशान्वये कोकणातील रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात माती उत्खनन, दगड, चिरे, खडी यांचे तात्पुरते उत्खनन करण्यासाठी नव्याने परवाने देणे बंद करण्यात आले असल्याने शासकीय विकासकामांसह खाजगी विकासकामे सद्य:स्थितीत ठप्प झाली असून व्यावसायिक आर्थिक गर्तेत सापडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राष्ट्रीय हरित लवाद न्यायाधीकरणाच्या निर्णयामुळे कोकण विभागात निर्माण झालेल्या गौण खनिज समस्येवर तोडगा काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१७-०८-२०२२) :** (१), (२), (३) व (४) मा.राष्ट्रीय हरीत लवाद पुणे बेंच यांनी मूळ अर्ज ६८/२०२० मध्ये दिनांक १७/०२/२०२२ रोजी पर्यावरण अनुमतीशिवाय तात्पुरते गौणखनिज उत्खनन परवाने देण्यात येवू नये असे आदेश दिले असल्याने, सदर मा.राष्ट्रीय हरीत लवाद यांच्या आदेशाचे अवहलेना होणार नाही यांची दक्षता घेण्याबाबत सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांना दिनांक २४/०३/२०२२ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

सदर आदेशाविरूध्द मा.सर्वोच्य न्यायालयात अपील दाखल करण्यात आले आहे.

---

## उंबरखेड (ता.तिवसा) येथील वर्धा नदीवरील रेती घाटामधून अवैधरित्या रेतीचा उपसा व वाहतूक सुरु असल्याबाबत

**(२०) १४८७४ (३०-०६-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उंबरखेड (ता.तिवसा) येथील वर्धा नदीवरील रेती घाटावरील लिलावाची मुदत संपल्यानंतरही नदीमध्ये अवैधरित्या रेतीचा उपसा सुरू असून वाहतूक सुरू असल्याबाबत दिनांक ११ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी अमरावती यांना तक्रार करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुदत संपवूनही व मुदत वाढ न देताही रेतीचा अवैध उपसा करून रेतीचा अवैध साठा हा शासकीय जागेत केल्याबाबत सुध्दा तक्रारीत उल्लेख करण्यात आलेला होता हे खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात कुठलीही कार्यवाही न झाल्याने तक्रारदाराने दिनांक ४ एप्रिल, २०२२ रोजी आमरण उपोषण करून स्वतःची प्रेतयात्रा काढून आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोटयवधीचा महसूल बुडवून अवैध रेतीचा उपसा करून व सरकारी जागेत रेतीचा अवैध साठा करून रेती विक्री करीत असूनही संबंधित तहसिलदार, तलाठी व मंडळ अधिकारी,कंत्राटदार यांच्यावर कुठलीही कार्यवाही न करणे व संगनमताने रेतीची तस्करी करण्यास मदत केल्यामुळे संबंधित सर्व दोषी अधिकाऱ्यांवर व रेती कंत्राटदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१७-०८-२०२२) :** (१), (२), (३), (४) व (५) जिल्हाधिकारी, अमरावती यांना प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तहसिल तिवसा यांनी केलेल्या दिनांक २५/०१/२०२२ च्या अहवालानुसार मौजे उंबरखेड ता.तिवसा येथून रेतीची विना परवानगी उचल व वाहतूक केलेली नाही.

सदर रेतीघाटाची मुदत दिनांक ०९ जून, २०२१ रोजी संपत असल्याने रेतीघाटधारक यांना महाराष्ट्र गौणखनिज (विकास व विनियमन) नियम, २०१३ चे नियम ७१(२) नुसार दिनांक ३१/१०/२०२१ पर्यंत विक्रेत्याचे लायसन्स मंजूर करण्यात आले होते. तद्नंतर शिल्लक असलेला रेतीसाठा उचल करणेकरीबाबत लिलावधारकाने केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने दिनांक ३१/१२/२०२१ पर्यंतच्या व दिनांक ०९/०६/२०२२ पर्यंतच्या कालावधीकरीता मुदतवाढ देण्यात आली आहे.

सदर तक्रारीबाबत तक्रारदार यांनी आंदोलनाबाबत तहसिलदार, तिवसा यांचेकडे निवेदन दिले होते. परंतु निवेदन कर्ते यांचेशी चर्चा करण्यात आल्याने तक्रारदार यांनी आंदोलन केलेले नाही.

तक्रारदार हे लिलावधारक यांना धमकी देवुन खंडणी मागत असल्याची लिलावधारक यांनी तक्रारदार यांचे विरूध्द पोलीस स्टेशन, तिवसा येथे गुन्हा अपराध क्र.०५१४ भारतीय दंड संहिता कलम ३८४ अन्वये खंडणीचा गुन्हा दिनांक ०१/१२/२०२१ रोजी दाखल केला आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.